## कोकण पाणथळ तक्रार निवारण समितीची ५३ वी बैठक
## दिनांक २३.०४.२०२५ रोजीचे इतिवृत्त

समितीचे विभागीय आयुक्त तथा अध्यक्ष, कोकण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली कोकण पाणथळ तक्रार निवारण समितीची **जिल्हाधिकारी, मुंबई शहर, ओल्ड कस्टम हाऊस, शहीद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई** येथे ५३ वी बैठक पार पडली. समितीच्या सदस्य सचिव यांनी उपस्थितांचे स्वागत केले व मा.अध्यक्ष यांच्याअनुमतीने समितीच्या कामकाजास सुरुवात झाली. सदर बैठकीस खालील नमूद अधिकारी व कर्मचारी व्यक्तीश: अथवा व्हि.सी.व्दारे उपस्थित होते.

| अ.क्र. | नाव | पद | कार्यालय |
|---|---|---|---|
| १. | डॉ.विजय सुर्यवंशी, भा.प्र.से. | मा.अध्यक्ष तथा विभागीय आयुक्त | विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन यांचे कार्यालय |
| २. | श्री.अक्षय गजभिये, भा.व.से. | सदस्य सचिव तथा उपवनसंरक्षक | कांदळवन कक्ष, मुंबई |
| ३. | श्रीमती आंचल गोयल, भा.प्र.से. | जिल्हाधिकारी | जिल्हाधिकारी, मुंबई शहर कार्यालय |
| ४. | डॉ.इंदु राणी जाखड, भा.प्र.से. | जिल्हाधिकारी (व्ही.सी.व्दारे) | जिल्हाधिकारी, पालघर कार्यालय |
| ५. | श्री. अनिल पाटील, भा.प्र.से. | जिल्हाधिकारी (व्ही.सी.व्दारे) | जिल्हाधिकारी, सिंधुदूर्ग कार्यालय |
| ६. | श्री.एस.एन.रेड्डी, भा.व.से. | उपवनसंरक्षक (व्ही.सी.व्दारे) | उपवनसंरक्षक (प्रा), सावंतवाडी यांचे कार्यालय |
| ७. | डॉ.अभय पिंपळकर | संचालक (व्ही.सी.व्दारे) | पर्यावरण विभाग, मुंबई |
| ८. | श्री. भाऊ गलांडे | अपर जिल्हाधिकारी (व्ही.सी.द्वारे) | जिल्हाधिकारी, रत्नागिरी कार्यालय |
| ९. | श्री.सतीश बागल | निवासी उपजिल्हाधिकारी (व्ही.सी.द्वारे) | जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर कार्यालय |
| १०. | श्री.चंद्रकांत सुर्यवंशी | निवासी उपजिल्हाधिकारी (व्ही.सी.द्वारे) | जिल्हाधिकारी, रत्नागिरी कार्यालय |
| ११. | श्रीमती कांचन ज्ञानोबा पवार | विभागीय वन अधिकारी (व्ही.सी.द्वारे) | कांदळवन विभाग, दक्षिण कोकण |
| १२. | श्री. दिपक खाडे | विभागीय वन अधिकारी (व्ही.सी.द्वारे) | कांदळवन विभाग, उत्तर कोकण |
| १३. | श्री.प्रदीप रा.तावरे | सहा.अधीक्षक, क्र. १ | जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शहर |
| १४. | श्रीमती उर्मिला पाटील | उपविभागीय अधिकारी | उपविभागीय अधिकारी, ठाणे यांचे कार्यालय |
| १५. | श्री.सुनिल जाधव | नायब तहसिलदार | उपविभागीय अधिकारी, पनवेल यांचे कार्यालय |
| १६. | डॉ.कैलास गायकवाड | उप-आयुक्त (परिमंडळ -२) | नवी मुंबई, महानगरपालिका |
| १७. | श्री.अवधूत तावडे | उप-आयुक्त | क.डो.म.पा |
| १८. | श्री.अभिजित भुजबळ | पो.नि. (सुरक्षा विभाग) | पोलीस अधिक्षक कार्यालय, रायगड |
| १९. | श्री.अजय वानखेडे | उपनियोजनकार | सिडको |
| २०. | श्री.राजेश पवार | का.अ. | नवी मुंबई, महानगरपालिका |
| २१. | श्री.स्टॅलिन डी | अशासकीय सदस्य | वनशक्ती |
| २२. | श्री.अनिल पंडीत | अशासकीय सदस्य | B.E.A.G. |
| २३. | श्री.ठाकरे | उपअधिक्षक (नमक) | उपआयुक्त (नमक) यांचे कार्यालय |
| २४. | श्री.वर्धन | स्थापत्य | उपआयुक्त (नमक) यांचे कार्यालय |
| २५. | श्री.राजमाने | वरिष्ठ पोलीस निरिक्षक | ठाणे शहर, पोलीस यांचे कार्यालय |
| २६. | डॉ.पिताले | शास्त्रज्ञ | BNHS, मुंबई |
| २७. | राधिका फडके | ( व्ही.सी.व्दारे ) | - |
| २८. | श्री.एस आर कुलकर्णी | ( व्ही.सी.व्दारे ) | - |
| २९. | पोलीस अधिक्षक कार्यालय | ( व्ही.सी.व्दारे ) | पालघर |
| ३०. | श्री.प्रशांत रोडे | अतिरिक्त आयुक्त ( व्ही.सी.व्दारे ) | ठाणे, महानगरपालिका |
| ३१. | उपविभागीय अधिकारी | ( व्ही.सी.व्दारे ) | वसई |
| ३२. | आर. जे. गायकवाड | ( व्ही.सी.व्दारे ) | - |
| ३३. | रियाज शेख | ( व्ही.सी.व्दारे ) | - |

टिप :- व्हि.सी.व्दारे उपस्थित सदस्य यांचे नाव व कार्यालय यांचा बोध होत नसल्यामुळे वरीलप्रमाणे नमूद करण्यात आलेले आहे.

| अ.क्र | विषय | करावयाची कार्यवाही |
|---|---|---|
| १ | बैठकीतील चर्चा | • कोकण पाणथळ तक्रार निवारण समितीच्या ५३ व्या बैठकीच्या सुरुवातीस समितीचे सदस्य सचिव यांनी समितीच्या बैठकीस उपस्थितीत सर्व जिल्हाधिकारी, संचालक, पर्यावरण विभाग, उपविभागीय अधिकारी, विभागीय वन अधिकारी, सर्व महानगरपालिकेचे प्रतिनिधी, वरिष्ठ नियोजनकार, सिडको, पोलिस निरीक्षक तसेच, व्हि.सी.व्दारे उपस्थित सर्व अधिकारी व कर्मचारी या सर्वांचे स्वागत केले.<br>• दि.२५ फेब्रुवारी, २०२५ रोजी झालेल्या कोकण पाणथळ तक्रार निवारण समितीच्या ५२ व्या बैठकीमध्ये मा.अध्यक्ष यांनी कोकण पाणथळ तक्रार निवारण समितीकडे प्राप्त जिल्हानिहाय तक्रारींबाबत संबंधित जिल्हाधिका-यांनी संचालक, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याशी समन्वय साधून CRZ, MRSAC आणि वेटलँड ॲटलस नकाशा तपासून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस सादर करण्याबाबत सूचना दिल्या होत्या. त्याबाबत, समितीचे सदस्य सचिव, यांनी समितीकडे एकूण २१ तक्रारी प्राप्त असून जिल्हानिहाय आढावा घेताना विहित नकाशे तपासून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल अप्राप्त असल्याचे सांगितले. |

| अ.क्र. | जिल्हा | तक्रारी संख्या | संबंधित यंत्रणा | |
|---|---|---|---|---|
| १ | मुंबई, शहर | २ | • समितीस प्राप्त मुंबई,शहरातील तक्रारीबाबत अशासकीय सदस्य यांनी वडाळा या ठिकाणी पाणथळ जागा असल्याचे वेटलँड ॲटलास मध्ये असून ते राष्ट्रीय हरित लवादाने (एनजीटी) देखील प्रमाणित केले आहे. तसेच, मा. सर्वोच्च न्यायालय व मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी देखील वेटलॅंट ॲटलॅस, २०१० मध्ये दर्शविल्याप्रमाणे पाणथळ ठिकाणाचे संरक्षण, संवर्धन तसेच, Restoration करण्याचे स्पष्ट आदेश दिलेले असल्याचे सांगितले. याबाबत, सहाय्यक अधिक्षक, जिल्हाधिकारी, मुंबई शहर कार्यालय यांनी सांगितले "राष्ट्रीय हरित लवादामध्ये प्रतिज्ञापत्र देण्यात आले असून सन २०१६, सन २०२० मध्ये पर्यावरण विभागाने पाणथळ क्षेत्राची माहितीकरिता पोर्टल ॲप उपलब्ध करुन दिले होते. त्यावर मुंबई, शहरातील Wetland Identify करुन त्याबाबतची माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत कळविले त्यानुसार, मुंबई, शहरात पाणथळ क्षेत्र नसल्याचे कळविण्यात आले होते. दरम्यान पाणथळ क्षेत्राबाबत नव्याने पुन्हा स्थळपाहणी झाली यामध्ये ३६ पाणथळ जागा Identify केल्या असल्याचे सांगितले." मा.अध्यक्ष यांनी पर्यावरण विभागातील अप्राप्त अहवालाबद्दल विचारणा केली त्याबाबत, व्हि.सी.व्दारे उपस्थित पर्यावरण विभागाचे संचालक यांनी मागील बैठकीत "समितीकडे प्राप्त जिल्हानिहाय तक्रारींबाबत संबंधित **जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयाने संचालक, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याशी समन्वय साधून विहित नकाशा तपासून कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याबाबत निर्देश दिले होते.** तथापि, दिलेल्या निर्देशाप्रमाणे तक्रारीबाबत संबंधित जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयाने अद्याप कोणत्याहीप्रकारे संपर्क केल्या नसल्याचे सांगितले". तसेच, अशासकीय सदस्य यांनी कोकण पाणथळ तक्रार निवारण समिती ही देखरेख ( Monitoring) करणारी समिति असून जिल्हानिहाय तक्रारींवर वेळेअभावी चर्चा करणे शक्य होत नसून, जिल्हा तक्रार निवारण समितीकडून तक्रारींचे निराकरण करुन त्याबाबतचा अहवाल कोकण पाणथळ तक्रार निवारण समितीकडे येणे अपेक्षित असल्याचे सांगितले. | जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचे कार्यालय |
| २ | मुंबई, उपनगर | ४ | • मुंबई, उपनगरच्या ३ तक्रारी असून नव्याने जुहू विमानतळ येथील बांधकामामुळे पाणथळ क्षेत्राच्या -हासाची तक्रार समितीस प्राप्त झाली आहे. उक्त तक्रार संबंधित यंत्रणेकडे एकत्रित स्थळपाहणी करिता पाठवून अहवाल समितीस पाठविण्याबाबत सूचना देण्यात येतील असे सदस्य सचिव यांनी सांगितले. तसेच, अशासकीय सदस्य यांनी जुहू येथील विमानतळ उभारणी खाजगी विकासकाव्दारे होत असून त्याजवळील पाणथळ क्षेत्राचा -हास होण्याची शक्यता असल्याचे वर्तविले. त्याबाबत, मा.अध्यक्ष यांनी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना जुहू येथील खाजगी विकासकाव्दारे उभारण्यात येणा-या विमानतळ जवळील पाणथळ क्षेत्राचे संरक्षण व संवर्धन करण्याबाबत जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना सूचना देण्याचे निर्देश दिले तसेच,सदर पाणथळ क्षेत्र प्रदूषित होत असल्यामुळे प्रदूषण नियंत्रण मंडळाशी संपर्क करुन त्याबाबत कोणते उपाय योजना राबविण्यात येतील. त्याबाबतचा अहवाल समितीस सादर करण्याबाबत सूचना दिल्या. सद्यस्थितीत ३ तक्रारीचे अहवाल प्रलंबित. | जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचे कार्यालय |
| ३ | रायगड | २ | • रायगड जिल्ह्यातील समितीस मौजे जासई व मौजे पाणजे येथील २ तक्रारी प्राप्त असून त्या सिडको विभागाशी संबंधित असल्याचे सदस्य सचिव यांनी सांगितले. त्याबाबत, बैठकीत उपस्थित सिडको यांचे प्रतिनिधी यांनी मौजे पाणजे येथील कांदळवन व गाळ काढण्यासाठी न्यायालयाकडे आवश्यक त्या परवानगीकरिता प्रलंबित आहेत. त्याबाबत, अशासकीय सदस्य यांनी सांगितले सिडको विभागाचे होल्डींग पॉन्ड असून पुराचे पाणी साठवून ठेवण्यासाठी त्याची उभारणी करण्यात आली असून त्यात कांदळवन आले आहे व ते CRZ क्षेत्रातील क्षेत्र आहे. त्यामुळे, त्यातील कांदळवन व गाळ काढण्यासाठी त्यांना उच्च न्यायालयाची परवानगी गरजेचे आहे असे सांगितले. त्याचप्रमाणे, पाणथळ क्षेत्राचे सिडकोव्दारे संरक्षण व संवर्धन होण्यासाठी निर्देश दिले. सिडको कडून दिलेले निर्देश प्रमाणे अहवाल अपेक्षित. | जिल्हाधिकारी, रायगड यांचे कार्यालय व व्यवस्थापकीय संचालक, सिडको |
| ४ | ठाणे | ४ | • उपविभागीय अधिकारी, ठाणे यांनी ठाणे जिल्ह्यातील ४ तक्रारींपैकी खारेगाव टोलनाक येथील एक तक्रार अशासकीय सदस्य यांची असून सदर तक्रारीबाबत ठाणे महानगरपालिका यांनी १.४ हेक्टरच्या डेब्रिज भरणी हटवण्यासाठी भिवंडी येथील ठिकाण अंतिम केलेले आहे. त्याकरिता, ६ कोटीपर्यंतचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास जिल्हा नियोजन विकास समितीमधून मागणी करण्यात आले असल्याचे सांगितले. याबाबत, अशासकीय सदस्य यांनी सांगितले की महाराष्ट्र सागर तटीय क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण यांनी या ठिकाणी स्थळ पाहणी केलेली आहे व त्यांनी याबाबतचा अहवालात स्पष्ट नमूद केले आहे की, सदर ठिकाणाचे डेब्रिज पूर्ण हटवून Creek इनलेट्स (खाडी) पातळीपर्यंत आणण्याचे गरजेचे असून ही प्रक्रिया मोठ्या खर्चाचीबाब आहे. तेथे दोन मोठे Creek इनलेट्स (खाडी) आहेत ते बंद केलेले आहे ते सुरु केले पाहिजे. सद्या तरी, डेब्रिज टाकणे बंद आहे पण मोठ्या प्रमाणात डेब्रिज असल्याचे सांगितले. याबाबत, मा.अध्यक्ष यांनी डेब्रिज हटविण्याची जबाबदारी कोणत्या यंत्रणेची | १. जिल्हाधिकारी, ठाणे यांचे कार्यालय<br>२. व्यवस्थापकीय संचालक, सिडको |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | असल्याचे विचारले त्याबाबत, अशासकीय सदस्य यांनी, डेब्रिज हटविण्याची जबाबदारी ही तेथील स्थानिक यंत्रणांची असल्याचे न्यायालयाचे स्पष्ट निर्देश आहेत असे सांगितले. त्यानूसार, मा.अध्यक्ष यांनी व्हि.सी.व्दारे उपस्थित ठाणे महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त यांना विचारणा केली त्याबाबत अतिरिक्त आयुक्त यांनी सांगितले खारेगाव टोलनाका येथील डेब्रिज काढण्याकरिता ठाणे, महानगरपालिकेस ६ कोटी निधीची आवश्यकता आहे. त्याकरिता जिल्हा नियोजन विकास समिती व शासनाच्या नगरविकास विभागाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला असल्याचे सांगितले. त्याबाबत, मा.अध्यक्ष यांनी नगरविकास विभागाकडे पाठपुरावा करावा व त्याबाबतच्या सद्यस्थितीबाबतचा अहवाल समितीस सादर करावा अन्यथा संबंधित खाजगी जागा मालकाकडून (सोनावाला) वसूली करावी किंवा शासनाकडे निधीची मागणी करावी नाहितर सदर विलंबामुळे न्यायालयाच्या आदेशाचा अवमान समजण्यात येईल असे सांगितले त्यामुळे, ठाणे, महानगरपालिका यांनी यावर लवकरात लवकर निर्णय घेऊन समितीस कळविण्याबाबत निर्देश दिले. तसेच, उपविभागीय अधिकारी, ठाणे यांनी उर्वरित ३ तक्रारी ह्या सिडकोशी संबंधित असल्याने सिडकोस त्याबाबत त्यांची हद्द निश्चित करण्याबाबत कळविले असल्याचे सांगितले. त्याबाबत, मा.अध्यक्ष यांनी बैठकीत उपस्थित सिडको यांच्या प्रतिनिधींना विचारणा केली असता सिडकोमार्फत संवेदनशील पाणथळ जागा संरक्षण करण्यासाठी तटरक्षक भिंती बांधण्याचे काम सुरु केले असल्याचे सांगितले. | ३. ठाणे, महानगरपालिका |
| | | ५ | पालघर | ८ | • पालघर जिल्हातील तक्रारींबाबत व्हि.सी.व्दारे उपस्थित जिल्हाधिकारी यांनी पालघर जिल्ह्यामध्ये एकूण ६ पाणथळ क्षेत्राची नोंदणी झाली असल्याचे सांगितले व राष्ट्रीय तटीय व्यवस्थापन (National Central for Sustainable Costal Management) या संस्थेमार्फत पाणथळची माहिती संकलन करण्याचे काम सुरु झाले असून त्यांना जिल्हाधिकारी, कार्यालयाच्या संबंधित अधिका-यांशी जोडून दिले आहे. सदर सर्वेक्षणाचे काम पूर्ण झाल्यानंतर पालघर जिल्ह्यातील वास्तविक पाणथळ क्षेत्र किती आहे याची माहिती उपलब्ध होणार आहे. याबाबत, अशासकीय सदस्य यांनी सांगितले की, सदर संस्था CRZ मधील पाणथळ क्षेत्र अंतर्भाव करीत नाही. त्याबाबत, व्हि.सी.व्दारे उपस्थित पर्यावरण विभागाच्या संचालकांनी सांगितले वेटलँड ॲटलॅस २०२१ करिता ओळखपटलेल्या सर्व पाणथळ जागांचा समावेश करण्यात येणार आहे. याबाबत, पालघर जिल्ह्यातील व्हि.सी.व्दारे. उपस्थित जिल्हाधिकारी यांनी सांगितले राष्ट्रीय तटीय व्यवस्थापन व पर्यावरण विभाग, महाराष्ट्र यांच्यात करार झालेल्या असून सदर कराराअन्वये राज्यातील वेटलँड ॲटलॅस, २०१० मध्ये दर्शविल्याप्रमाणे पाणथळ क्षेत्र स्थळ पाहणी करुन अहवाल देणार आहे. तसेच, संचालक, पर्यावरण विभाग यांनी MRSAC नकाशे प्रामुख्याने कांदळवन करिता असल्याने पाणथळ जागेसाठी CRZ, वेटलँड ॲटलॅस व MMB नकाशे याचा वापर करण्याबाबत विनंती केली. याबाबत, मा.अध्यक्ष यांनी पाणथळ तक्रारींकरिता MRSAC नकाशे ऐवजी MMB नकाशे व CRZ, वेटलँड ॲटलॅस नकाशे तपासून समितीस अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या. | जिल्हाधिकारी, पालघर यांचे कार्यालय |
| | | ६ | सिंधुदूर्ग | १ | • सिंधुदूर्ग जिल्ह्यातील तक्रारीबाबत मा.अध्यक्ष यांनी संचालक, पर्यावरण विभाग यांचेशी समन्वय साधून CRZ, MMB व वेटलँड ॲटलॅस नकाशे तपासून समितीस अहवाल देण्याबाबत निर्देश दिले. | जिल्हाधिकारी, सिंधुदूर्ग यांचे कार्यालय |
| | | एकूण | | २१ | | |
| १ | मा.अध्यक्ष यांनी दिलेल्या सूचना | • मा. अध्यक्ष तथा विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांनी समितीकडे प्राप्त जिल्हानिहाय तक्रारींबाबत जिल्हा तक्रार निवारण समितीकडून संबंधित जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयाने संचालक, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याशी समन्वय साधून CRZ, MMB आणि वेटलँड ॲटलस नकाशा तपासून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीच्या पुढील बैठकीपूर्वी सादर करण्याबाबत सूचना दिल्या.<br>• मा.अध्यक्ष यांनी ठाणे जिल्ह्यातील तक्रारीसंदर्भात सिडको यांच्या प्रतिनिधींनी सांगितल्याप्रमाणे "सिडकोमार्फत संवेदनशील पाणथळ जागा संरक्षण करण्यासाठी तटरक्षक भिंती बांधण्याचे काम सुरु असल्याबाबतचा" अहवाल समितीस सादर करण्याबाबत व रायगड जिल्ह्यातील मा.उच्च न्यायालयाकडे प्रलंबित असलेल्या परवानगीच्या सद्यस्थिबाबतचा अहवाल सिडकोने समितीस सादर करणेबाबत निर्देश दिले.<br>• तसेच, मा.अध्यक्ष यांनी पाणथळ ठिकाणचे डेब्रिज शास्त्रीयरित्या उचलण्याबाबत स्थानिक यंत्रणांनी सदर निधीसाठी मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार सनियंत्रण समितीच्या कामाचा आढावा घेण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या शासन स्तरावरील मा.अपर मुख्य सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखालील समितीपुढे सादर करावे लागणार आहे. त्यामुळे, पाणथळचे पुर्नस्थापन (Restoration) करण्यासाठी स्थानिक यंत्रणांनी अंदाजपत्रके तयार करुन त्याकरिता आवश्यक निधीसह (Associated Cost) संबंधित जिल्हाधिकारी कार्यालर्यामार्फत सर्व बाबी समाविष्ट करुन अंदाजपत्रके समितीच्या पुढील बैठकीपूर्वी सादर करणेबाबत मा.अध्यक्ष यांनी पुनश्च सूचना दिल्या. | | | | | |

(अक्षय गजभिये, भा.व.से.)
सदस्य सचिव,
कोकण पाणथळ तक्रार निवारण समिती
तथा उपवनसंरक्षक, कांदळवन कक्ष

(डॉ. विजय सुर्यवंशी, भा.प्र.से.)
अध्यक्ष,
कोकण पाणथळ तक्रार निवारण समिती
तथा विभागीय आयुक्त, कोकण विभाग